PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 2, ISSUE 2

# ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक विद्यार्थांचे सामाजिक वातावरण व स्वजाणीव यांच्यातील सहसंबंधांचा अभ्यास

रिसर्च स्कॉलर
**हरिश्चंद्र लक्ष्मण भोईर**
जि. प. शाळा, शेलवली(बांगर) ता. शहापूर
जिल्हा:ठाणे, पिन: ४२१४०५
**महाराष्ट्र भारत**

मार्गदर्शक
**डॉ. नरेंद्र पी. पाटील**
गोखले एज्युकेशन कॉलेज ऑफ
एज्युकेशन ॲड रिसर्च, परेल,
मुबंई **महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

प्रत्येक मूल हे वेगळे आहे. प्रत्येकात काहीतरी वेगळेपण इतरांपेक्षा प्रकर्षाने जास्त ठासुन भरलेलं असतं हे शास्त्रज्ञांनी अनेक प्रयोगांतून सिध्द केले आहे. असे जरी असले तरी विदयार्थ्याला मिळणाऱ्या सामाजिक वातावरणाचा त्यांच्या स्वजाणीवांवर प्रभाव होत असतो.विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे उद्‌दिष्ट मानले जाते.शिक्षणातील शैक्षणिक संपादणूक ही भविष्यकालीन जीवनातील व्यावसायीक निवडीची गुरूकिल्ली आहे.शैक्षणिक प्रगती ही देशाच्या विकासात अत्यंत महत्वपूर्ण भुमिका बजावत असते.प्राथमिक शिक्षणापासुन सुरू झालेली सुरूवात पुढे माध्यमिक शिक्षणाची पायाभरणी ठरते. आज शासन स्तरावर शिक्षण क्षेत्रात प्रगती करण्यासाठी विविध योजनांची अमलबजावणी केली जाते.परंतु अजुनही आपल्या देशात ग्रामिण भागात विशेषत: आदिवासी भागात शिक्षणाची स्थिती म्हणावी तितकी चांगली नाही.याला अनेक कारणे कारणीभुत असतात.दाखल झालेल्या प्रत्येक मुलाची शैक्षणिक संपादणूक चांगली व्हावी अशी शासनापासून पालकांचीही अपेक्षा असते.परंतू विद्‌यार्थ्याच्या शैक्षणिक संपादनावर त्याला मिळत असलेले सामाजिक वातावरण यांचा मोठा प्रभाव पडत असतो.विदयार्थी ज्या सामाजिक आर्थिक स्तरातून येतो त्याचा परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच शैक्षणिक प्रगतीवरही पडत असतो.

व्यक्तीला मिळालेल्या सामाजिक वातावरणाचा प्रभाव व्यक्तीच्या एकंदर जीवनशैलीवर मरेपर्यंत दिसतो.

**स्वजाणीव–**

प्रत्येक विदयार्थ्याच्या स्वत:बद्दल काही ईच्छा आकांक्षा असतात.त्यात सुधारणा करण्याची उर्मी निर्माण होते.बालकाचा 'स्व 'विकास झाला की तो समाजाचा सदस्य बनतो.स्व विकासाची सुरूवात कुटूंबापासूनच होत असते.समाजात त्या स्व विकासाची परिसीमा गाठली जाते.समाज व कुटूब यांत वावरत असतांनाच बालक आपले गुण दोष शोधत असते.संस्कृत मध्ये यालाच 'सोहम्' असे म्हटले जाते.

स्वत:ची ओळख करून घेणे ,स्वत:ची जाणीव करून घेणे यालाच स्व जाणीव असे म्हणतात.यांत स्वकल्पनांपासून ,भावना ,स्वत:बद्दलचा विश्वास व मूल्य इत्यादी सर्वांचा समावेश स्व जाणीवेत होत असतो.स्वची जाणीव ही व्यक्तीमत्त्व विकासाचा पाया मानली जाते.स्वत:ची ओळख करून घेणे, ?

आपण कोण आहोत याची जाणीव या सर्व गोष्टी यांत समाविष्ट असतात.स्व जाणीवेतील सर्व गोष्टींचा सामाजिक संबंध सुधारण्यासाठी उपयोग होत असतो.स्व जाणीवेमुळेच विदयार्थ्यांच्या जीवनाला स्वयंदिशा प्राप्त होत असते.

## संशोधनाची गरज

ठाणे जिल्हयातील काही तालुके हे आदिवासी लोकसंख्या जास्त असलेले दुर्गम आहेत.दुर्गम व आदिवासी भाग असल्याने शिक्षणाच्या संधी शासनाने निर्माण केलेल्या आहेतच त्यासाठी त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ते साठी विविध उपक्रमांचे आयोजन शासन स्तरावर केले जातात.या विविध उपक्रमांचे आयोजन करत असतांना संशोधक स्वत: या उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष सहभागी आहे. हे सर्व उपक्रम राबविले जात असले तरी दर्जेदार शिक्षणाबाबत आपली प्रगती समाधानकारक दिसत नाही. संशोधक स्वत: शिक्षक असल्याने तसेच आदिवासी भागात काम करीत असल्याने सामाजिक वातावरण तसेच शालेय वातावरणाबाबत संशोधकाला चांगली माहिती आहे.

समाजिक वातावरणाचा प्रभााव विदयार्थ्यांच्या स्वजाणीवेवर होत असतो. .यासर्व गोष्टींच्या विकासात पालक, शिक्षक व समवयस्क मित्र हे सर्वच हातभार लावत असतात.पालक वा शिक्षकांनी केलेली प्रशंसा वा निंदा या सर्व गोष्टी कळत नकळत विदयार्थ्याच्या एकंदर व्यक्तीमत्त्वाबरोबरच विदयार्थ्याचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या ठरतात अथवा विपरित परिणाम करणाऱ्या ठरतात.आदिवासी भागातील एकदंर सामाजिक परिस्थिती पाहता सामाजिक वातावरण व शालेय वातावरण हे विदयार्थ्यांच्या संपादनावर, स्वजाणिवेवर, सामाजिक समायोजन, कार्यात्मक मूल्य व कल्पना तसेच शैक्षणिक विकासाबरोबर विदयार्थ्यांच्या बौध्दीक क्षमतेवरही परिणाम करत असतो. विदयार्थ्यांच्या स्वजाणीवेचा विदयार्थ्यांच्या शालेय दृष्टीकोनातून शालेय समायोजन, सहशालेय उपक्रमांतील सहभाग, नैतिक मूल्य, व्यक्तिमत्त्व, त्याच्या भावना, स्वअभ्यास सवयी यावर पडतो का? याचा अभ्यास होणे संशोधकाला गरजेचे वाटते

## संशोधनाचे महत्व

१. प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाचे शिक्षक, शाळा, मुख्याध्यापक, पालक व विदयार्थी तसेच समाज व शासन यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.
२. शिक्षकांनी विदयार्थ्यांच्या स्वजाणीवेतील सकारात्मक घटकांचा विकास कसा करावा यासाठी हे संशोधन शिक्षकांना उपयुक्त ठरु शकते
३. विदयार्थ्यांची व्यक्तिमत्व बहूमुखी करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून या संशोधनाचा शाळा, शिक्षक व मुख्याध्यापक यांना फायदा होऊ शकतो.
४. स्वाजाणीव व सामाजिक वातावरण एकमेकावर कसे प्रभावी ठरते हे पाहण्यासाठी हे संशोधन मार्गदर्शक म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

✓ शासन स्तरावरील विविध शैक्षणिक योजना व सामाजिक योजनांची अंमलबजावणी विदयार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरते. यासाठी हे संशोधन उपयुक्त व पथदर्शी ठरणार आहे

✓ शालेय वातावरणात कोणता बदल विदयार्थ्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरु शकतो याचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन महत्त्वपूर्ण आहे.

**समस्या विधान—**

‘ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक विदयार्थ्यांचे सामाजिक वातावरण व स्वजाणीव यांच्यातील सहसंबंधांचा अभ्यास’

**संशोधनाची चले —**

अ.आश्रयी चल — स्वजाणीव
आ.स्वाश्रयी चले:— सामाजिक वातावरण

**कार्यात्मक शब्दांच्या व्याख्या—**

**ठाणे जिल्हा —** महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हयांपैकी एक जिल्हा

**आदिवासी भाग —** आदिवासी रहिवासी जास्त असलेला प्रदेश

**माध्यमिक शाळा** —बहूउद्देशिय व्यावसायीक शाळा किंवा कोणतीही संस्था जी मंजूर केलेले क्रमवार शिक्षण देण्याचे कार्य करते किंवा ज्या शाळेत ९वी ते १०वीचे शिक्षण दिले जाते.

**समाजिक वातावरण** — व्यक्तीचे कुटूंब, शेजारी व आजूबाजुचा परिसर , आचार विचार तसेच व्यक्ती किंवा गटाची सामाजिक व आर्थिक दर्जा ठरविणारी परिस्थिती किंवा पार्श्वभूमी.**स्वजाणीव** — 'स्वजाणीव म्हणजे व्यक्तीचा स्वत:कडे बघण्याचा दृष्टीकोन, व्यक्तीचे स्वत:विषयीचे मत' 'स्व'ची ओळख,व्यक्तीचे एकंदर व्यक्तीमत्त्व

**संबंधित साहित्याचा आढावा—**

संशोधकाने संबंधित साहित्याचा आढावा घेतला असता शैक्षणिक संपादना संदर्भात पुढील मुद्द्यांवर संशोधन झालेले आढळले

- घरगुती वातावरण
- संस्था अंतर्गत शाळा व वर्ग वातावरण
- विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संदर्भात
- शाळेच्या भौतिक सुविधा
- पालकांचा दृष्टीकोन
- शिक्षकांच्या अध्यापन पद्धती

परंतू विदयार्थ्याच्या व्यक्तीमत्वावर परिणाम करणाऱ्या स्वजाणीवे संदर्भात व विशेषत: आदिवासी भागातील विदयार्थ्याच्या सामाजिक वातावरणाच्या संदर्भात महाराष्ट्रात व देशात फारसे संशोधन झाल्याचे आढळून आले नाही. संशोधनाच्या आढाव्यातून आदिवासी भागातील विदयार्थ्यासंदर्भात संशोधन करणे गरजेचे आहे. असे संशोधकाला वाटते.

**संशोधनाची गृहीतके**:—

१. विदयार्थ्यांची सामाजिक वातावरणस पातळी भिन्न—भिन्न असते.
२. विदयार्थ्यांची स्वत्वाच्या कल्पना भिन्न—भिन्न प्रकारच्या असतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक वातावरणाचा अभ्यास करणे.
२. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या स्वजाणीवेचा अभ्यास करणे.
३. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक विदयार्थ्यांचे सामाजिक वातावरण व स्वजाणीव यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची परिकल्पना**

**शून्य परिकल्पना:**

१. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यात लक्षणीय सहसंबंध आढळत नाही.
२. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या लिंग निहाय सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यात लक्षणीय सहसंबंध आढळत नाही

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**अ. भौगोलिक मर्यादा**–प्रस्तुत संशोधन ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळांपूरतेच मर्यादित आहे.ठाणे जिल्हा वगळून इतर जिल्हयांना गृहित धरलेले नाही.ठाणे जिल्हयातील आदिवासी तालुके वगळून इतर तालुक्यांचा यात समावेश केलेला नाही.

**ब.** प्रस्तुत संशोधनात फक्त आदिवासी भागातील माध्यमिक शाळांतील विदयार्थ्यांचाच समावेश केला आहे.शहरी भागातील विदयार्थ्यांचा यात समावेश केलेला नाही.

**क.** प्रस्तुत संशोधनात फक्त आदिवासी भागातील अनुदानित व विना अनुदानित तसेच आश्रम शाळांचाच विचार केला आहे.

**उद्दिष्टे मर्यादा** – प्रस्तुत संशोधनात संशोधकाने निश्चित केलेला प्रमुख हेतु व त्यानुसार केलेली संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेतली आहेत.

**संशोधन कार्यपद्धती**

**अ) संशोधन पद्धती**

- सदर संशोधनासाठी वर्णनात्मक सर्व्हेक्षण पध्दतीतील सहसंबंध पद्धतीचा उपयोग केला .

**ब) नमुना**

- विद्यार्थी,
  यांची साध्या यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली.
- **क.न्यादर्श**
- जेव्हा जनसंख्या मोठी असते तेव्हा एक टक्के,दोन टक्के,पाच टक्के किंवा दहा टक्के नमुना निवडतात. व जेव्हा जनसंख्या कमी असते तेव्हा २५ टक्के किंवा ५० टक्के व्यक्ती न्यादर्श म्हणून निवडतात.

- प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे न्यादर्श घेण्याचे ठरविले आहे.

**ठाणे जिल्हा**
**एकूण तालुके (७)**
**न्यादर्श तालुके (३) १००टक्के**
**एकूण आदिवासी भागातील माध्यमिक शाळा ८६**
**न्यादर्श ४३ शाळा ५० टक्के**

वरील जनसंख्येतील १५टक्के विदयार्थ्यांची सुगम न्यादर्श पध्दतीनत निवड करण्यात आली.

| अ.क्र. | तालुका | आदिवासी भागातील एकूण माध्यमिक शाळा | | एकूण जनसंख्या | | न्यादर्श टक्केवारी | न्यादर्श | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | निवडलेल्या | ९वी | १०वी | १५ टक्के | ९वी | १०वी |
| १ | शहापूर | ६० | ३० | १८०० | १५६० | | २७० | २३४ |
| २ | मुरबाड | २० | १० | ६२० | ५३० | | ९३ | ७९ |
| ३ | भिवंडी | ६ | ३ | १८९ | १७१ | | २८ | २६ |
| एकूण | | ८६ | ४३ | २६०९ | २२६१ | | ३९१ | ३३९ |

**ड) माहिती संकलनाची साधने**

- **प्रस्तुत संशोधन वर्तमानकाळातील असल्यामुळे माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला.यात**

**प्रमाणित साधने:**

- १)स्वजाणीव वर आधारित प्रश्नावली
- २)सामाजिक वातावरणावर आधारित प्रश्नावली.

- **केंद्रिय प्रवृत्तीचे मापन करण्यासाठी** –सरासरी

- **विचलन मोजण्यासाठी** –प्रमाण विचलन टक्केवारीचा उपयोग करण्यात आला

- **अनुमानात्मक विश्लेषण—**. प्रस्तुत संशोधनात परिकल्पनांचा पडताळा घेऊन अनुमानात्मक विश्लेषण करण्यासाठी संशोधकाने पुढील सांख्यिकी तंत्रे वापरली.

  **१) सहसंबंध गुणक   २) आलेख**

- सदर संशोधनामध्ये इयत्ता नववी आणि इयत्ता दहावी अशा दोन गटातील संबंधाचा विचार करण्यात आला.संशोधकाने स्वजाणीव व सामाजिक वातावरण या दोन चलांमधील गुणांचे निकष लक्षात घेतले .चलांमधील आपआपसांत सहसंबंध पाहण्यासाठी व माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पियरसन कोरिलेशन बायसिरियलचा वापर करण्यात आला.

- माहितीचे सादरीकरण करताना संशोधन उद्दिष्टे आणि परिकल्पना यांच्या अनुषंगाने विचार केला आहे. त्यासाठी आय बी एम एम एस पी एस एस २२ सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला.

- **TABLE 4.1: Standard wise Mean, SD, N, df and Correlation Coefficient of Social Environment and Self Concept**

| इयत्ता | सामाजिक वातावरण | | स्वजाणीव | | न्यादर्श | स्वाधीनता मात्रा df | सहसंबंध गुणांक r pb | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सरासरी Mean | प्रमाण विचलन SD | सरासरी Mean | प्रमाण विचलन SD | | | | |
| नववी | 109.30 | 12.76 | 179.33 | 12.15 | 391 | 387 | 0.328 | p<0.01 |
| दहावी | 114.70 | 14.74 | 180.67 | 12.42 | 339 | 335 | 0.458 | p<0.01 |

तक्ता क्र.४.१ वरून असे लक्षात येते की सांख्यीकीय दृष्टया सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यांमध्ये अतिशय घनिष्ट संबंध आहे.इयत्ता ९ वीचा सहसंबंध गुणांक ०.३२८ आणि इयत्ता १० वीचा सहसंबंध गुणांक ०.४५८ आहे जो ०.०१ च्या स्तरावर महत्त्वपूर्ण आहे. सहसंबंध गुणांक ०.०१ पेक्षा मोठा असल्याने 'ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यात लक्षणीय सहसंबंध आढळत नाही.'ही परिकल्पना त्याज्य ठरविण्यात येते. त्यासाठी कोहेनकृत पियरसन परस्पर सहसंबंध गुणांक मापकाचा वापर करण्यात आला आहे.

**TABLE 4.8: Gender wise Mean, SD, N, df and Correlation Coefficient of Social Environment and Self Concept**

| Gender | सामाजिक वातावरण | | स्वजाणीव | | न्यादर्श | स्वाधीनता | सहसंबंध | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सरासरी Mean | प्रमाण विचलन SD | सरासरी Mean | प्रमाण विचलन SD | | मात्रा df | गुणांक r pb | |
| मुले | 110.50 | 15.24 | 180.03 | 13.17 | 319 | 315 | 0.452 | p<0.01 |
| मुली | 112.82 | 12.82 | 180.45 | 11.55 | 411 | 407 | 0.328 | p<0.01 |

तक्ता क्र.४.२ वरून असे लक्षात येते की सांख्यीकीय दृष्टया सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यांमध्ये अतिशय घनिष्ट संबंध आहे.मुलांचा सहसंबंध गुणांक ०.४५२ आणि मुलींचा सहसंबंध गुणांक ०.३२८ आहे जो ०.०१ च्या स्तरावर महत्त्वपूर्ण आहे. सहसंबंध गुणांक ०.०१ पेक्षा मोठा असल्याने ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या लिंग निहाय सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यात लक्षणीय सहसंबंध आढळत नाही'ही परिकल्पना त्याज्य ठरविण्यात येते. त्यासाठी कोहेनकृत पियरसन परस्पर सहसंबंध गुणांक मापकाचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

१. सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यांतील परस्परसंबंधाचा विचार करता इयत्ता नववी व दहावीच्या बाबतीत मध्यम स्वरूपाचा परिणाम दिसुन येतो.
२. लिंग निहाय सामाजिक वातावरण आणि स्वजाणीव यांतील परस्परसंबंधाचा विचार करता इयत्ता नववी व दहावीच्या बाबतीतही मध्यम स्वरूपाचा परिणाम दिसुन येतो.
३.सामाजिक वातावरणाचा प्रभाव विदयार्थ्यांच्या स्वजाणीवेवर होत असतो.
४.सामाजिक वातावरणातील कौटुंबिक वातावरणाचा प्रभाव विदयार्थी स्वजाणीवेवर होतो.

## संदर्भ टिपा

1) देव अलका कमलाकर(१९९१),व्यक्तीमत्त्व विकास,स्व संकल्पना,य.च.म.मुक्त विदयापीठ,नाशिक

2) बोरूडे,देशपांडे सु.वा.(१९७२),माध्यमिक मानसशास्त्र महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ,गो.य. राणे प्रकाशन पुणे.

3) पंडित रवि (१९६५),मानसशास्त्राची मूलतत्त्वे,विदया प्रकाशन नागपूर

4) कोलमन,जेम्स सी. कंटेपररी(१९७९)सायकालॉजी ॲण्ड इफेक्टीव्ह बिहेवियर,ग्लेन व्ही इलिनॉय,स्कॉट फेरिसमन ॲण्ड कंपनी

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 2, ISSUE 2

5) जगताप डॉ.ह.ना.(१९९२)अध्ययन उपपत्ती व अध्ययन,नुतन प्रकाशन, पुणे

6½ D. J. Murray – A History of Western Psychology

7) **Cohen, B. H. (2013).** Explaining psychological statistics (4th ed.). Hoboken, NJ: Wiley.

8) **DeVellis, R. F. (2003).** Scale development: Theory and applications (2nd ed.). Thousand Oaks, CA: Sage Publications.

9) **Kline, R. B. (2005).** Principles and practice of structural equation modeling (2nd ed.). New York: Guildford.

10) **Sheskin, D. J. (2011).** Handbook of parametric and nonparametric statistical procedures (5th ed.). Boca Raton, FL: CRC Press.